बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या मानवाधिकाराचा एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा विभाग

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविद्याशाखेतंर्गत मानवाधिकार विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर केला जाणारा शोध-प्रबंधाचा आराखडा

संशोधक

स्वप्नील मारोतीराव नरबाग

आशिर्वाद नगर, नांदेड

मार्गदर्शक

डॉ.नारायण तु. कांबळे

(प्राध्यापक)

पदवी व पद्व्युत्तर समाजशास्त्र विभाग

स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरुर ताजबंद ता.अहमदपुर जि.लातूर

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर - २०२४

बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या मानवाधिकाराचा एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा विभाग

प्रस्तावना :

अपरिपक्व, निराधार, उन्मार्गी कुमारवयीन गुन्हेगार मुलांवर सुसंस्कार करणारी एक संस्था तिची कार्यपद्धती सुधारात्मक व दंडात्मक शाळा अशी होती. इंग्रजी भाषेत या संकल्पनेला हाऊस ऑफ करेक्शन, पेनिटेंशरी, रिमांड होम, रिफॉर्मेटरी वगैरे संज्ञा असून त्यांना मराठी भाषेत 'सुधारगृह' हा पर्यायी शब्द रुढ झाला आहे. सुधारगृह ही आधुनिक संकल्पना प्रथम पश्चिम युरोपात प्रायोगिक अवस्थेत जन्माला आली आणि नंतर ती विसाव्या शतकात जगात सर्वत्र प्रसृत झाली. पश्चिम युरोपमधील सोळाव्या-सतराव्या शतकातील ब्राईडवेलसारख्या सुधारगृहसदृश संस्थेत या संकल्पनेचे मुळ आढळते असे अनेक इतिहासकार म्हणतात; कारण अशा प्रकारची कुमारांना सुधारण्याची पहिली संस्था लंडनमधील ब्राईडवेल कॅसल येथे इ.स.१५५७ मध्ये सहाव्या एडवर्डच्या देणगीतून उदयास आली. त्यानंतर अशा प्रकारच्या संस्थांना ब्राईडवेल हे नामविधान प्राप्त झाले. हे सुधारगृह (हाऊस ऑफ करेक्शन) कुमारवयीन गुन्हेगारांना विशेषतः उडाणटप्पू मुले, वेश्याव्यवस्था करणाऱ्या मुली, अनिष्ट कृत्ये करणारे कुमार आदींना सुधारण्यासाठी स्थापना झाले आणि असे गृहीत धरण्यात आले होते की, तेथील कडक शिस्त, साधे राहणीमान व त्यांच्याकडे सोपविलेली कामे-कर्तव्ये यातून त्यांना त्यांच्या गुन्हेगारीविषयीची जाणीव व्हावी व त्यातून त्यांच्यात सद्वर्तन व चारित्र्य घडवून आणावे, हा मूळ उद्देश होता. सुधारगृहांच्या या दिनक्रमात पुढे काही अन्य बाबींचे मिश्रण झाले, तरीसुद्धा या सुधारणावादी चळवळीचा आदर्शवाद अकृत्रिमच राहिला. त्यामुळेच या चळवळीतून पुढे युरोपमध्ये अन्य काही संस्था याच धर्तीवर उदयास आल्या. त्यापैकीच अकराव्या पोप क्लेमंट याने हट्टी, दुराग्रही, या कार्यशाळेत तत्कालीन आधुनिक तंत्राचा आणि विशेषत्वे स्त्री आणि पुरुष अशा स्वतंत्र वर्गीकरणाचा उपयोग केला होता. एकोणिसाव्या शतकात

यूरोपभर आणि अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत ही चळवळ प्रविष्ट झाली; मात्र बालगुन्हेगारांत सुधारणा घडवून आणण्यासाठी तीन गुन्हेगारांचे वयोमान १६ ते ३० ठरविण्यात आले. त्यांच्यासाठी विशेष अभ्यासक्रम नेमून दिलेला होता. त्यात मुलोद्योग शिक्षण व व्यावसायिक नैपुण्य यावर भर दिलेला असे. यातील पहिली सुधारणा शाळा (सुधारगृह) म्हणजे न्यूयॉर्क राज्यातील एल्मीरा गावी स्थापन झालेले एल्मीरा सुधारगृह होय (स्था. १८७६). ती फक्त पुरुष गुन्हेगारांसाठीच होती. ती दंडशास्त्रीय पद्धतीतील पुरोगामी व अग्रेसर संस्था होती. अमेरिकेतील या गुन्हेगारांच्या सुधारणावादी चळवळीतून इंग्लंडमधील प्रसिद्ध बोर्स्टल पद्धतीचा जन्म झाला. ती बोर्स्टल या गावी सुरु झाल्यामुळे 'बोर्स्टल स्कूल' या नावाने ख्यातनाम झाली. त्यामध्ये प्रशिक्षित अशा तज्ज्ञ कर्मचाऱ्यांकडून तरुण गुन्हेगारांना शिक्षण-प्रशिक्षण देण्यात येईल. या औपचारिक शिक्षणाबरोबरच शारीरिक, धार्मिक व धंदेविषयक शिक्षणाची तिथे सोय केलेली होती. बोर्स्टल पद्धतीचे विस्तार कार्यक्रम यशस्वी झाले आणि राष्ट्रकुल 'अमेरिकन प्रिझन असोसिएशन' ही संस्था या संदर्भात स्थापन करण्यात आली. तिने तरुण गुन्हेगारांसाठी शिक्षण, पुनर्वसन याबरोबरच गुन्हेगारांच्या मानसशास्त्रीय विश्लेषणाची योजना कार्यवाहीत आणली.

या मुलांचे शिक्षण, आरोग्य, रक्षण यांची ममत्वाने देखभाल केली पाहिजे. कुठल्याही गुन्हेगार मुलास निरीक्षण काळात पोलीस कोठडीत वा कारागृहात ठेवण्यात येऊ नये. त्याला स्वतंत्र क्रमांक देण्यात येईल आणि गुन्ह्यात सापडलेल्या मुलाला प्रमुख न्यायाधिशांपुढे उभे करण्यात येईल (२४ तासाच्या आत) व नंतर त्याला बाल कल्याण समितीपुढे हजर करण्यात येईल. मुलाचे नाव, शाळा व इतर माहिती गुप्त ठेवण्यात येईल, जर ती प्रसार माध्यमांनी प्रकाशित केली, तर अशा व्यक्तीस रुपये २५,०००/- दंड ठोठाविण्यात येईल. बालन्यायालय आणि बालसमित्यांनी किती मुलांची चौकशी पूर्ण केली, किती मुलांची प्रगती झाली, याचा आढावा दर सहा महिन्यांनी राज्य शासन घेईन. निरीक्षण गृहातील काळ संपल्यानंतर त्यांचे पुनर्वसन करुन त्यांनी भावी जीवनाची जपणूक

केली पाहिजे. मुलांचे पुनर्वसन समाधानकारक होईल, याची खात्री पटेपर्यंत चौकशी चालु राहील. पुनर्वसनाची जबाबदारी पालक, दत्तक पालक, पोषित पालक (फॉस्टर फादर), समाजसेवक, उद्योजक आणि स्वयंसेवी संस्था यांनी घेतली पाहिजे. पालकांना दत्तक घेण्याचा निर्णय न्यायालयाकडून मिळेल. जी मुले विधिसंघर्षग्रस्त नसतील, ती काळजी व संरक्षण यासाठी बालकल्याण मंडळापुढे येतील.

निरीक्षणगृहांनी सुधारगृहांची जागा घेतल्यामुळे गुन्हेगार मुलांचा व्यापक दृष्टिकोणातून विचार होऊ लागला आणि काही प्रमाणात बालगुन्हेगारीस पायबंद बसू लागला.

बालसुधारगृहाची व्याख्या :

बालसुधारगृह हे असे ठिकाणी आहे जिथे अनैतिक किंवा बेकायदेशीर कामात अडकलेल्या तरुणांना सुरक्षितपणे ठेवले जाते आणि त्यांची जीवनशैली सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. या ठिकाणी तरुणांना पुन्हा समाजात यशस्वी नागरीक बनवण्यासाठी शिक्षण, प्रशासकीय मदत आणि मानसिक आरोग्य अशा अनेक सुविधा पुरवल्या जातात.

बालगृहे सहसा सरकारी किंवा निमसरकारी संस्था चालवतात. तेथील तरुणांना शिक्षण, समुपदेशन आणि नोकरी प्रशिक्षण यासह विविध सेवा देतात. बालगृहांचा उद्देश तरुणांना त्यांचे जीवन बदलण्यास आणि समाजाचे सक्षम सदस्य बनण्यास मदत करणे हा आहे.

संशोधन विषयाची निवड :

बालसुधारगृह बालगुन्हेगारांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसवण्यात यावा तसेच त्यांचे भविष्यातील जीवन हे गुन्हे क्षेत्रापासून अलिप्त ठेवून भविष्यात एक सुजाण नागरिक बनवण्याचे महत्त्वाचे केंद्र आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने वरील उद्देशानुसार बालसुधारगृहाची स्थापना केली असून त्या संदर्भात अनेक संहिता व नियमावली

बनवण्यात आल्या आहेत. तसेच बालगुन्हेगारांना सुधारण्यासाठी नैतिक शिक्षणाचे धडे येथे देण्याचा उद्देश आहे. बालगुन्हेगारांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकार प्रयत्न करत आहे. पण बालसुधारगृहातील बालगुन्हेगारासंदर्भात ठरवण्यात आलेल्या संहितेचे योग्य पालन होत नाही, या संदर्भात राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. यामुळे बालसुधारगृहामधील बालगुन्हेगारांना गुन्हेगारी क्षेत्रापासुन परावृत्त करण्यास बालसुधारगृह अपयशी ठरत आहेत का? हा महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भाने प्रस्तुत **बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या मानवाधिकाराचा एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा विभाग** हा विषय अध्ययनासाठी निवडण्यात आलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

प्रस्तुत बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या मानवाधिकाराचा एक चिकित्सक अभ्यास या अनुषंगाने आहे. कोणत्याही देशातील प्रचलनात असणाऱ्या कायद्यान्वये उपजिवीका व जीवन निर्वाह सुरळीतपणे करण्यासाठी त्या देशातील सर्व नागरीकांना प्राप्त होणाऱ्या सुखसोयी, लाभ किंवा तरतूदी म्हणजे अिाकार. पणप्रचलित कायद्यातील तरतूदीचे लाभ महिला, पुरुष व बालकांना समानपणे मिळतील याची हमी नाही. म्हणून तत्ववाद्यांनी सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास केला. ज्याची परिणती म्हणजे मानवाधिकाराच्या संकल्पनेचा उदय होणे हा आहे. बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या मानवाधिकाराच्या अंमलबजावणी संदर्भात कोणत्या प्रकारचे अडथळे वा उपायोजना निर्माण केलेल्या आहेत. वा होणे अभिप्रेत आहे. याचा शोध घेण्यासाठी या पार्श्वभुमीवर अभ्यास होणेगरजचे आहे.

हे संशोधन अनेक पातळ्यांवर महत्वाचे आहे. बालगुन्हेगारी निर्मूलनाच्या संदर्भात मानवाधिकाराच्या संदर्भात योगदान देते. व्यावहारीकदृष्ट्या निष्कर्ष मराठवाड्यातील

बालसुधारगृह विकासाच्या संदर्भात येगदान देणारा आहे म्हणून या अभ्यासाला वेगळे महत्व असणार आहे.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तूत संशोधन विषयाच्या अनुषंगाने होणाऱ्या संशोधनाला योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या मानवाधिकाराच्या अनुषंगाने यापुर्वी जे काही संशोधन वा अभ्यास झालेले आहेत त्यातील काही उपलब्ध साहित्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे.

१. मंजु कुमारी (२०००) वाराणसी शहरातील रामनगर येथील तसेच औसानगंज नावाच्या बालसुधारगृहांची अध्ययन करुन बालगुन्हेगार बनण्यामागील कारणांचा आढावा घेतला तसेच बालसुधारगृहाच्या सुधार प्रणालीबाबत मुल्यांकन केले.

२. ममता मयी मिश्रा (२००२) यांनी उड़ीसा शहराच्या समाजातील बालगुन्हे व बालसुधारगृहे या संबंधीत विविध बाबींवर अध्ययन केले आहे.

३. एस.के.भट्टाचार्य (२००४) यांनी बाल न्याय व्यवस्था व बालगुन्हेगारांच्या सुधारणांच्या व अधिकारांच्या संदर्भात संशोधन भारतासंदर्भात केले आहे.

४. के.पी.पद्मजा (२००८) यांनी भारतातील बालगुन्हेगारांसंबंधीत विविध पैलु जसे की बालगुन्हेगारीची कारणे? बालसुधारगृहातील कार्यप्रणाली तसेच बालन्यायालय इत्यादी विषयांवर संशोधन केले आहे.

५. मिश्रा शैलेजा (२००९) यांनी बालगुन्हेगारांच्या रचनात्मक-चिंतन व शिक्षणाच्या बाबतीत बालसुधारगृहांच्या भुमिचा अभ्यास केला आहे त्यात ते असे निष्कर्ष दर्शवितात.

i) निरक्षर बालगुन्हेगारांच्या शैक्षणिक सुधारणेसाठी बालसुधारगृहांची भुमिका ही महत्वाची राहिली आहे. प्रशिक्षणाच्या पुर्वी शिक्षणासंबंधीत बालगुन्हेगारांची परिस्थिती हि चिंताजनक होती.

६. रेखा दुबे (२०२५) यांनी बालगुन्हेगारांच्या कौटुंबिक पार्श्वभुमी या विषयावर कानपुरे बालसुधारगृहातील बालगुनहेगारांचा अभ्यास केला त्यांनी या अभ्यासात असे निष्कर्ष मांडले की बालसुधारगृहात राहणारे ज ास्तीत जास्त बालगुन्हेगार हे विभक्त कुटुंबातील पार्श्वभुमीतून येतात. निम्म्यापेक्षा जास्त ही निरक्षर कुटुंबातून होती.

७. जाकिया रफत (२०१८) बालगुन्हेगार : एक समाजशास्त्रीय अभ्यास या संशोधनपुर्व लेखात बिजनौर येथील बालसुधारगृहातील २५ बालगुन्हेगारांची निवड करुन केलेल्या अभ्यासात त्यांना आढळून आले की वर्तमान काळात भारतीय समाजात बालगुन्हेगारीमध्ये निरंतर वाढ होत आहे. तसेच बालगुन्हेगार हे मोठ्या प्रमाणात चोरीच्या गुन्ह्यातून आले होते.

संशोधनाची उद्दिष्टे :

- बालसुधारगृह, बालगुन्हेगार आणि मानवाधिकाराची संकल्पनात्मक मांडणी करुन त्या संदर्भातील विविध कायद्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास करणे.
- बालसुधारगृहाची पार्श्वभुमी स्पष्ट करुन त्या संदर्भातील विविध कायद्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणे.
- बालसुधारगृहात बालगुन्हेगारांना दिल्या जाणाऱ्या वर्तनाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करणे.
- बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक व इतर सोयी-सुविधांचा अभ्यास करणे.

- बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांना सुधारण्यासाठी शासनाकडून अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या विविध उपाय योजनांचा आढावा घेणे.
- बालसुधारगृहामध्ये बालगुन्हेगारी सुधारण्यासाठी प्रतिबंधक उपाय योजनांसाठी समुपदेशन आणि इतर सुविधांचा अभ्यास करणे.
- बालसुधारगृहातील बालगुन्हेगार हे भविष्यात गुन्हेगारी क्षेत्राकडे जाता कामा नये या संदर्भातील उपाय योजनांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :

- बालसुधारगृहातील विविध कायद्यांचे पालन बालसुधारगृहात करण्यात येत नाही.
- बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांना मिळणाऱ्या सोई-सुविधा अपुऱ्या आहेत.
- बालसुधारगृहातील बालगुन्हेगार हे भविष्यातील गुन्हेगारी क्षेत्राकडे वळू नये या संदर्भातील उपाय योजना अपुऱ्या आहेत.
- बालसुधारगृहातील बालगुनेगार सुधारण्याकरीता करण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अभाव आहे.

अध्ययन क्षेत्र :

प्रस्तुत संशोधन बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या मानवाधिकारांच्या अनुषंगाने आहे हे संशोधन महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागापुरतेच मर्यादीत आहे. मराठवाडा विभागातील एकुण ८ जिल्ह्यापुरते असून त्यामध्ये प्रामुख्याने औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, लातूर, बिड, हिंगोली, नांदेड, परभणी यांचा समावेश आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तूत संशोधनाची उद्दिष्ट्ये लक्षात घेऊन तथ्य संकलत करण्याच्या दृष्टीने प्राथमिक व दुय्यम अशा दोन्हीही स्त्रोतांचा व साधनाचा वापर केला जाईल. वरील संशोधन उद्दिष्टांच्या अनुषंगाने संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती व तथ्य संकलनासाठी अर्थातच संशोधकांचा भर प्रामुख्याने या विषयावरील उपलब्ध व अगोदरच प्रकाशित असलेल्या साहित्यावर असेल त्या विशेषतः बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व मानवाधिकारासंबंाी प्रकाशित झालेले साहित्य, शासनाने प्रकाशित केलेल्या विविध अहवाल, वृत्तपत्रे, मासिकांचा आधार घेतला जाईल. बालसुधारगृह व बालगुन्हेगार आणि ह्यांचेमानवाधिकारासंदर्भात अभ्यासासाठी पुरक अशी माहिती ज्या ज्या स्त्रोतांकडून मिळेल त्याचाही संशोधनासाठी आधार घेतला जाईल. संबंधीत विषयाची मांडणी ही समाजशास्त्रीय आकलन होण्याच्या दृष्टीने समाजशास्त्रीय ग्रंथांचाही आधार घेतला जाईल.

संशोधन आराखडा :

प्रस्तूत संशोधन विषयाचा अध्ययन करण्यासाठी संशोधन आराखडाचा अवलंब करावा लागतो. परंतू संशोधनाचा विषय, उद्दिष्ट्ये लक्षात घेऊन निदानात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधन कालखंड :

बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या मानवाधिकाराचा एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा विभाग या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी सन २०१८-२०२३ हा पाच वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही देशातील बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांच्या अधिकाराचे अध्ययन करणे, त्यासाठी नमुना म्हणून मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील बालसुधारगृहाची निवड करण्यात आली आहे. या बालसुधारगृहामध्ये प्रतिबंधात्मक उपायोजना म्हणून विविध कायद्याचे अध्ययन करण्यात येणार आहे. हे संशोधन विशेष करुन बालसुधारगृहांशी संबंधीत कायद्यांचा व बालगुन्हेगारांच्या अधिकारांचा अभ्यास करण्याशी संबंधीत आहे ही या संशोधन विषयाची मर्यादा आहे.

तथ्य संकलन :

१. प्राथमिक तथ्य संकलन

प्राथमिक तथ्य संकलनामध्ये प्रामुख्याने मराठवाड्यातील बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांचा अभ्यास करण्यासाठी संशोधक प्रत्यक्ष निरीक्षण करुन बालगुन्हेगार तसेच बालसुधारगृहातील अधिक्षक, शिक्षक आणि अन्य कर्मचारी यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन प्राथमिक तथ्य संकलित करण्यात येणार आहे.

२. दुय्यम तथ्य संकलन :

दुय्यम तथ्य संकलनामध्ये संशोधक विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व बालसुधारगृहाचे प्रकाशित वार्षिक अहवाल, राष्ट्रीय बाल अधिकार व संरक्षण आयोगाचे अहवाल, मासिक, नियतकालिके, वर्तमानपत्र, इंटरनेट, बालसुधारगृह संदर्भातील कायदे, शासकीय निर्णय व परिपत्रके इत्यादी साधनांचा आधार घेऊन प्रस्तुत विषयाचे विश्लेषण करण्यात येईल.

संशोधन तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक तथ्ये संकलित करुन संकलित केलेल्या तथ्यांचे वर्गीकरण करुन सांख्यिकीय पध्दतीने विश्लेषण व निर्वचन करण्यात येणार येईल. तसेच दुय्यम तथ्य संकलन व प्राथमिक तथ्य संकलनातील तथ्याचे अध्ययन करुन अंतिम निष्कर्ष काढण्यात येणार आहेत.

साहित्य संदर्भ पध्दत :

संशोधनास संदर्भ देण्यासाठी पुढील पध्दतीचा वापर करण्यात येईल. प्रस्तुत संशोधन प्रबंधात समाजशास्त्रात जागतीक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या ASA (American Sociological Association) च्या चौथ्या आवृत्तीच्या मार्गदर्शक सूचनांचा वापर करण्यात येईल.

तार्किक किंवा सैध्दांतिक दृष्टिकोन :

एकूण पाच सिध्दांताच्या सहाय्याने मानवाचे हक्क स्पष्ट होतात. त्यामध्ये प्रामुख्याने १) नैसर्गिक हक्क सिध्दांत २) कायदेशिर हक्कांचा सिध्दांत ३) हक्कांचा ऐतिहासिक सिध्दांत ४) समाजकल्याण सिध्दांत ५) हक्कांचा आदर्शवादी सिध्दांत. प्रस्तुत संशोधनासाठी यामधील कायदेशीर हक्कांचा सिध्दांत हा महत्वपूर्ण ठरतो. व्यक्तीचे मुलभूत अधिकार म्हणजे स्वतःच्या अस्तितवासाठी आवश्यक असणारे कायदे असतात. ज्यांचे संरक्षण फक्त संबंधीत राज्य किंवा राष्ट्राद्वारेच केले जाऊ शकते. कोणत्याही हक्कांच्या अंमलबजावणीसाठी संबंधीत राज्यांच्या मान्यतेची आवश्यकता असते. ज्यांच्यात कायद्याची अंमलबजावणी करण्याचे सामर्थ्य असते.

प्रकरणाची मांडणी :

संकलीन तथ्यांचे वर्णन, विश्लेषण व अन्वयार्थ स्पष्टतेसाठी खालील सहा प्रकरणामध्ये संशोधन प्रबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे ती पुढीलप्रमाणे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - संशोधन पध्दती व संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन

प्रकरण तिसरे - बालगुन्हेगाराची वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभूमी

प्रकरण चौथे - बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांचे अधिकार व संहिता

प्रकरण पाचवे - मराठवाड्यातील बालसुधारगृहातील बालगुन्हेगारांचे अधिकार एक निरीक्षणात्मक अभ्यास

प्रकरण सहा - निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ ग्रंथ :

१. अडेनवाला, महारुख, २००६, 'कायद्याच्या विरोधातील बाल संरक्षण आणि बाल न्याय प्रणाली', (चाइल्डलाइन इंडिया फाऊंडेशन, मुंबई, NHRC)

२. अब्राहमसेन, डेव्हिड १९६०, 'क्राइमचे मानसशास्त्र', कोलंबिया प्रेस, न्यूयॉर्क.

३. अब्राहम, फ्रान्सिस एम. १९८२, 'आधुनिक समाजशास्त्रीय सिद्धांत : एक परिचय', ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली.

४. आहुजा, राम १९९२, 'भारतातील सामाजिक समस्या', रावत पब्लिकेशन, जयपूर.

५. आहुजा, राम १९८१, 'द प्रिझन सिस्टीम' : कारागृह कस्टडीची प्रभावीता आणि परिणाम, साहित्य भवन, आग्रा.

६. आहुजा, राम १९६९, 'भारतातील महिला गुन्हेगार', मीनाक्षी प्रकाशन, मेरठ.

७. अखिलेश एस., १९९९, 'बाल अपराध', ऑस्कर पब्लिकेशन, दिल्ली.

८. बागुलिया ए.एम., २००६, 'बाल आणि गुन्हेगारी', SBS प्रकाशन आणि वितरक, नवी दिल्ली.

९. www.wikipedia.org.

१०. www.lawctopus.com

११. www.childcrimeinindia.com

१२. मेहेत्रे, स्मीता, २०११, भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, नागपुर, साईनाथ प्रकाशन.

१३. चतुर्वेदी, अरुण व लोढा, संजय (संपा.) २००५, भारत मे मानवाधिकार जयपुर, पंचशील प्रकाशन.

१४. Prasad, Bipin, २०१३, Dalits and Human Rights, Jaipur, Ritu Publication.

१५. Mumtaz Ali, १९९६, Human Rights and the Delits, New Delhi, D.K. Publishers.

१६. कुमार मंजु, २०००, भारत मे बाल अपराध, प्रिन्टवैल पब्लिशर्स डिस्ट्रीब्यूटर्स, जयपुर.

१७. Mishra, Mamta May, २००२, Juvenile Delinquency and the Urban Society, Merut, Anu Books.

१८. Bhattacharya, S.K., २००४, The Juvenile Justice System in India from welfare to rights, Oxford University Press.

१९. Padmaga K.P., २००८, Juvenile Delinquency, ICFAI University Press.

२०. शैलजा मिश्रा, बाल अपराधियों के रचनात्मक-चिंतन एवं शैक्षिक अभिवृत्ति के विकास में बाल सुधार गृहँा की भूमिका का अध्ययन, भारतीय आधुनिक शिक्षा, एन.सी.ई.आय.टी. वर्ष ३०, अंक १ जुलै २००९.

२१. रेखा दुबे, २०१५, बाल अपराधियों की पारिवारिक पृष्ठभूमि का अध्ययन, राधा कमल मुखर्जी : चिन्तन परम्परा, वर्ष १७ अंक-२, जुलाई-दिसम्बर, २०१५, पृ.१२३-१२५.

२२. रफत जकिया, २०१८, बाल-अपराध : एक समाजशास्त्रीय अध्ययन, शोध मंथन, मार्च, पृष्ठ ९७-१०२, आर्टिकल नं.१५.

संशोधक
स्वप्नील मारेतीराव नरबाग

मार्गदर्शक
डॉ.नारायण टी.कांबळे
(प्राध्यापक)
पदवी व पद्व्युत्तर समाजशास्त्र विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरुर ताजबंद
ता.अहमदपुर जि.लातूर